RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. :

दि. ०३ मे २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmahavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## खासदार संजय जाधव उद्धव ठाकरेंची साथ सोडणार?

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनेक भूकंप होत असतानाच आता परभणीचे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय जाधव यांच्या एका विधानाने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे कट्टर समर्थक मानले जाणारे जाधव आता वेगळी वाट धरणार का? अशा चर्चांना परभणीत उधाण आले आहे.

परभणीतील एका खाजगी रुग्णालयाच्या उद्घाटन प्रसंगी खासदार संजय जाधव बोलत होते. यावेळी त्यांनी आपल्या राजकीय भविष्याबाबत सूचक विधान केले. ते म्हणाले, ''मी ज्यांच्यामुळे मोठा झालो त्यांचा कधीही विश्वासघात करणार नाही, पण सध्याची परिस्थिती बदललेली आहे. निवडणुकीत आर्थिक गणित महत्त्वाचं असतं, त्यामुळे पुढे काय होईल सांगता येत नाही.'' जाधव यांच्या या विधानातील 'आर्थिक गणित' आणि 'बदलेली परिस्थिती' या दोन शब्दांनी सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. त्यांनी थेट पक्षांतराचे नाव घेतले नसले तरी, भविष्यात ते 'परिस्थितीनुसार' मोठा निर्णय घेऊ शकतात, असे संकेत यातून मिळत आहेत.

मागील काही दिवसांपासून संजय जाधव हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना किंवा भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या वावड्या उठत आहेत. या चर्चांना त्यांच्या ताज्या वक्तव्यामुळे अधिक बळ मिळाले आहे. विशेष म्हणजे, पत्रकारांनी यावर त्यांची भूमिका विचारली असता त्यांनी कॅमेरासमोर अधिक भाष्य करणे टाळले, ज्यामुळे संभ्रम अधिक वाढला आहे.

संजय जाधव यांनी अद्याप पक्ष सोडण्याची अधिकृत घोषणा केलेली नाही. मात्र, परभणीत ठाकरे गटाची मोठी ताकद असलेल्या जाधवांनी जर टोकाचा निर्णय घेतला, तर तो 'उबाठा' गटासाठी मोठा धक्का मानला जाईल. जिल्ह्याच्या राजकारणात सध्या जाधव ठाकरेंच्या शिवसेनेतच राहणार की शिंदे गट किंवा भाजपकडे वळणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## टीका करणाऱ्यांची आम्ही पर्वा करत नाही; अंगावर ३०० गुन्हे पण... नागपुरात बच्चू कडूंचा घणाघात

**नागपूर/प्रतिनिधी :** ''इतर पक्षांनी आणि मोठ्या नेत्यांनी सोयीनुसार पक्ष बदलले, आघाड्या केल्या तेव्हा कुणी काही बोलले नाही, पण आता माझ्यावर जाणीवपूर्वक टीका केली जात आहे. मात्र, पैशाने विकल्या जाणाऱ्या अशा चिथावणीखोर लोकांची आम्ही अजिबात पर्वा करत नाही,'' असा घणाघाती हल्ला बच्चू कडू यांनी नागपुरात बोलताना केला. आपण घेतलेल्या राजकीय निर्णयावरून होणाऱ्या टीकेला त्यांनी यावेळी सडेतोड उत्तर दिले, तसेच शेतकरी आणि दिव्यांगांसाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला.

आपल्या नव्या राजकीय वाटचालीबद्दल बोलताना बच्चू कडू म्हणाले की, आता महाराष्ट्राला शिवसेनेचा एक नवा चेहरा पाहायला मिळेल. हा चेहरा केवळ राजकारण करणारा नसून तो शेतकरी आणि दिव्यांगांसाठी रस्त्यावर उतरून लढणारा असेल. ''माझ्या हातात असलेला भगवा हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा आहे. याच विचाराने आपण संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणार आहोत. शिवसेनेची ताकद वाढवून ती शेतकरी आणि दिव्यांगांच्या पाठीशी खंबीरपणे उभी करू. काहीही सुटले तरी चालेल, पण शेवटच्या श्वासापर्यंत मी शेतकरी, कामगार आणि दिव्यांगांची साथ सोडणार नाही,'' अशी भावनिक साद त्यांनी घातली.

## नाशिकमधील धीरेंद्र शास्त्रींच्या कार्यक्रमावर टांगती तलवार; कारण...

**नाशिक/प्रतिनिधी :** धीरेंद्रकृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर धाम बाबा यांचा आज २ मे रोजी शहराजवळील गोवर्धन शिवारात कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मात्र या कार्यक्रमावर टांगती तलवार आहे. कारण यासाठी अंनिसकडून विरोध दर्शवण्यात आला आहे. चमत्काराचे दावे करुन अंधश्रद्धांना खतपाणी घालणाऱ्या आणि महाराष्ट्रातील संत व महापुरुषांविषयी वारंवार अपशब्द वापरणाऱ्या या बाबाचा कार्यक्रम रद्द करावा, अशी म ागणी आता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच धीरेंद्र शास्त्रींनी जर चमत्कार सिध्द केला तर २१ लाखांचे रोख पारितोषिक देण्यात येईल, असे आव्हान धीरेंद्र शास्त्री यांना करण्यात आले आहे. धीरेंद्र शास्त्री यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समि तीच्या अटी- शर्ती,नियम पाळून कोणत्याही शासकीय इमारतीच्या खोलीमध्ये त्या विषयांचे तज्ज्ञ, शासकीय अधिकारी, पोलीस, पत्रकार आणि त्यांचे व संघटनेचे मोजके पदाधिकारी यांच्या समक्ष आधुनिक विज्ञानाच्या कसोट्यांवर दैवी चमत्कारिक दावे सिद्ध करावेत. त्याशिवाय, अंनिसने दिलेल्या १० व्यक्तींच्या मनातील प्रश्न ओळखावेत, त्यांचे नाव , गाव व पत्ता सांगावा. असे त्यांनी करून दाखविल्यास चमत्कार सिद्धीसाठी म हाराष्ट्र अंनिसचे २१ लाखांचे पारितोषिक त्यांना मिळेल. कार्यक्रम रद्द करण्याची मागणीअंधश्रद्धांना खतपाली घालणाऱ्या आणि महापुरुषांच्या आणि संतांच्या बद्दल अवमानकारक शब्द वापरणाऱ्या धीरेंद्रकृष्ण शास्त्रीचा नाशिकमध्ये होणारा कार्यक्रम रद्द करावा अशी मागणी अंनिसने केली आहे.

# महाविहार सातकर्णी नगर येथे भव्य १० फूट उंच बुध्दमूर्तीचे शानदार अनावरण

## लातूर शहरात तथागत बुध्द जयंती निमित्त धम्म मिरवणूकीचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित महाविहार धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव ता.जि. लातूर येथे वैशाख पौर्णिमा व बुध्द जयंती निमित्त सायंकाळी भव्य दहा फुट उंच भूमी स्पर्श मुद्रा अवस्थेतील तथागत बुध्दाच्या मूर्तीचे अनावरण व लोकार्पण संस्थेचे अध्यक्ष पु. भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या हस्ते करण्यात आले.





तथागत बुध्द जयंतीच्या निमित्ताने सकाळच्या प्रथम सत्रात लातूर शहरात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीच्यावतीने डॉ. आंबेडकर चौक येथे धम्म ध्वजारोहन करून बुध्द मुर्ती भिक्खु संघ, बौध्द उपासक उपासिका यांची धम्म मिरवणूक संपन्न झाली. त्यानंतर सायंकाळी दुसऱ्या सत्रात बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने बुध्द मुर्ती अनावरण व लोकार्पण सोहळ्याचे आयोजन महाविहार सातकर्णी नगर येथे करण्यात आले. प्रारंभी बोधी वृक्षाची पूजा, परित्राण पाठाचे पठण करून त्रिशरण पंचशील व सामूहिक बुध्द वंदना करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे, लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, अभिनेत्री प्रियंका उबाळे, संपादक प्रा. रामेश्वर बद्दर, डॉ. सुधाकर गुळवे, ॲड. मल्लिकार्जुन करडखेलकर, भालचंद्र सोनकांबळे मंचावर उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे इत्तर मान्यवरांचा बुध्दविहारच्यावतीने सन्मान करण्यात आला. या प्रसंगी तथागत बुध्द आणि बौध्द धम्म हा आपल्या भारत देशाला मिळालेली देणगी आहे. बुध्दाची शिकवण संपूर्ण जगाला उपकारक असून जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धाच्या शांतीची गरज असल्याचे प्रतिपादन प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री व आ. संजय बनसोडे यांनी शुभेच्छापर बोलताना केले. या सोबतच लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे यांनी देखील बुध्द जयंती निमित्त सर्वांना हार्दीक शुभेच्छा दिल्या.

तथागत बुध्द हे भारताचे सर्वोत्तम भूमीपुत्र आहेत. बुध्दाच्या मानवतेची शिकवण अतुलनीय आहे. मानवता, करुणा, शांती,आणि बंधुभाव ही तत्वे लोक कल्याणाची आहेत. अखिल मानव समाजाने बुध्दाच्या नैतिक शिकवणीचे आपल्या जीवनात करणे आवश्यक आहे. महाविहार सातकर्णी नगर स्थापन केलेली बुध्द मुर्ती ही करुणा, शांती मैत्रीचे प्रेरणा देत राहील असे उदघाट्नपर मार्गदर्शन पु. भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी केले. यावेळी भिक्खु महाविरो थेरो, भिक्खु सुमेध नागसेन, भिक्खु धम्मसार, भंते बोधीराज यांचीही धम्म देशना संपन्न झाली.

तथागत बुध्दाची विचारधारा ही संपूर्ण विश्वाला उपयुक्त अशी शिकवण आहे. राजा सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धम्माला गती दिली. बुध्द जयंती ही आंबेडकर जयंती प्रमाणे अनुयायांनी मोठया प्रमाणात साजरी करण्याचे आवाहन प्रास्ताविकपर मनोगतातून कार्यक्रमाचे संयोजक भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देवदत्त सावंत यांनी केले. यावेळी बसवंत उबाळे, आर. पी. गायकवाड, केशव कांबळे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, भीमराव चौदंते, पांडुरंग अंबुलगेकर, सुशिल चिकटे, गोविंद कांबळे, डॉ. संजय गवई, भरत कांबळे, डॉ. विजय अजनीकर, राहुल बागडे, मयूर बनसोडे, राजकुमार गंडले, यशपाल कांबळे, धम्मानंद वानखेडे, विलास आवशंक, राहुल डुमने, डॉ. सिद्धार्थ सूर्यवंशी, विशाल बहात्तरे, सुजाता आजनीकर, आशा चिकटे, मयुरी आल्टे, मिना कदम, शशिकला सुरवसे, कल्पना कांबळे, कविता कदम, निर्मला थोटे, सरिता बनसोडे, कविता कदम, कांता काकडे, पंचशीला बनसोडे, शिला वाघमारे, शारदा लामतुरे आदीजन मोठया संख्येने बौध्द अनुयायांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सतिश मस्के, उदय सोनवणे, राजेश कदम, अनिरुध्द बनसोडे, मिलिंद धावारे, यशपाल मस्के, गौतम आदमाने, करण ओव्हाळ, आकाश सरवदे, समाधान आचार्य, कृष्णा सुरवसे, चंद्रसेन भडके, गिरीधर कांबळे, नवनाथ कांबळे, डॉ. अरुण कांबळे, कुमार सोनकांबळे, ज्योतीराम लामतुरे इत्यादीनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता भिक्खु संघाच्या आशिर्वादाने करण्यात आली.

## अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण थांबवा व्हीएस पँथर्सची मागणी



**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स चे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष शरद किणीकर यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हा अधिकाऱ्यांना निवेदन देऊन अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण थांबविण्याची मागणी करण्यात आली. भारतीय संविधानामध्ये संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करावे असे कुठेही सुचवलेले नाही तरीसुद्धा शासन सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून अनुसूचित जातीमध्ये असलेली समानता नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. हे उपवर्गीकरण तात्काळ थांबविण्यात यावे अन्यथा व्ही एस पँथर्स तीव्र आंदोलन छेडेल असा इशारा यावेळी देण्यात आला.

या निवेदनावर संपर्कप्रमुख आनंद जाधव विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे जिल्हाध्यक्ष शरद किनीकर विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार शहर सचिव आयान पठाण शहर संघटक अल्फेज शेख सैफ मणियार सागर सूर्यवंशी आदिंच्याच्या स्वाक्षरी आहेत.


## व्ही एस पँथर्स च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात बुद्ध जयंती निमित्त देखावा




**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या विद्यार्थी आघाडीच्या मराठवाडा विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बुद्ध जयंती निमित्त देखावा उभा करण्यात आला आहे या देखाव्याचे अनावरण संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी संघटनेचे मार्गदर्शक संतोष मांदळे रवी कुरील विद्यार्थी आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे जिल्हा उपाध्यक्ष सुरज कांबळे जिल्हा कार्याध्यक्ष नवनाथ शेंडगे जयंती अध्यक्ष तेजस सरवदे शहराध्यक्ष आविष्कार कांबळे अक्षय कांबळे शहर सचिव रोहित दंडे शहर संघटक रितेश जांभळे सुदर्शन ओव्हळ विशाल गायकवाड विरनाथ गायकवाड सुबोध महाळंगीकर सुजित मस्के उत्कर्ष सुर्यवंशी ओम पाटील अनिकेत पाटील प्रवीण बिरादार महेश सूर्यवंशी कुलदीप सुर्यवंशी अनिकेत कांबळे आदी जण पदाधिकारी उपस्थित होते...

# विवेकशील जीवन हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया..! - भंते महाविरो थेरो

**अहमदपूर/प्रतिनिधी :** जगातील संपूर्ण प्राण्याचा एक स्वभाव आहे.आहार, निद्रा,भय,मैथून पण तथागत बुद्धांनी मनुष्याला याच्यापुढे जाऊन या चार गोष्टीत गुरफटून न राहता विवेकशील राहून सर्व तृष्णेचा त्याग करायला शिकवतात व जीवन प्रज्ञामय आणि विवेकशील असावे यावर भर देतात. त्यामुळे मनुष्याचा खऱ्या अर्थाने सामाजिक व वैश्विक उद्धार होऊ शकतो असे प्रतिपादन पूज्य भंते महाविरो थेरो यांनी केले.






तालूक्यातील मौजै काळेगाव येथील तक्षशिला बुद्ध विहार येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षे बुद्ध पौर्णिमेनिमित्त धम्म प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात प्रवचन देताना ते बोलत होते. सकाळच्या सत्रात युवकनेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या हस्ते धम्मध्वजारोहन संपन्न झाले.

त्यानंतर उपस्थित भिक्खू संघास भोजन दान देण्यात आले. दुपारच्या सत्रात मान्यवरांचा सत्कार व धम्मदेसना कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे,जेष्ठ नेते दिलीपरावजी देशमुख,नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले,मंत्रालयातील अधिकारी रत्नाकर खिल्लारे,समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड,आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळेस प्रत्येक पौर्णिमेचा दायक यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तर ग्रामविकास अधिकारी म्हणून सेवा निवृत्त झालेले राजेंद्र कांबळे यांचा सपत्नीक तर गोपीनाथराव जोंधळे,उत्तम कांबळे यांचा संयोजन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवक नेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रा.डी.बी.शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष गायकवाड, डॉ.बालाजी थिट्टे, बजरंग गायकवाड, विठ्ठल कांबळे, नितीन सरकाळे, प्रभाष कसादे, सचिन बानाटे आदी धम्म्मसेवकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी तक्षशिला बूध्द विहार येथे दिवसभर हजारों बौध्द उपासक उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

संपादकीय...

## असह्य उन्हाचे चटके, हवामानाचा विचार जरुरी

फेब्रुवारी ते मे हे चार महिने उन्हाळ्याचे म्हणून ओळखले जातात. हवामानातील चढउतारामुळे तुलनेत फेब्रुवारी व मार्च सुसह्य गेले. परंतु, यंदाचा एप्रिल सर्वार्थाने तापदायक असल्याचा अनुभव देशातील नागरिक घेताना दिसतात. उत्तर भारताची अवस्था सध्या भटारखान्यासारखी झाली असून, उष्णतेच्या लाटांमुळे येथील जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाड्याला दरवर्षीच उष्णतेच्या लाटांचे तडाखे बसतात. परंतु, यंदा अर्धा अधिक महाराष्ट्र उष्णतामानात होरपळून निघत असल्याचे चित्र आहे. राज्यातील जवळपास २२ शहरांमधील तापमानाचा पारा चाळीशीपार जावा, यातूनच सध्याचा प्रकोप कसा असावा, याचा अंदाज येतो. महाराष्ट्रासह काही राज्यांमध्ये उष्माघाताने बळी गेल्याचीही उदाहरणे समोर आली आहेत. हे पाहता सर्वांनाच तब्येतीची अधिकची काळजी घ्यावी लागेल. आरोग्य विभागाने उन्हापासून संरक्षण करणे वा पुरेसे पाणी पिण्यासह दिलेल्या अन्य गाईडलाईन्सचे प्राप्त परिस्थितीत पालन करणे प्रत्येक नागरिकाच्या हिताचे असेल. उष्णतेच्या लाटांसंदर्भात संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना म्हणजे एएफओ आणि जागतिक हवामान संघटनेने प्रसृत केलेला अहवाल तर अतिशय महत्त्वाचा आहे. उष्णतेच्या लाटांमुळे भारतीय शेतीसह जगभराचे मोठे नुकसान झाल्याचे चित्र आहे. अतिउष्णतेमुळे संपूर्ण कृषीव्यवस्थाच विस्कळीत वा बाधित होऊ शकते, अशी भीतीही या अहवालातून व्यक्त करण्यात आली आहे. भारतातील ६० टक्के जनता आजही शेती व शेतीपूरक उद्योगांवर अवलंबून आहे. परंतु, अति उष्णतामानामुळे शेतीपुढे अनेक आव्हाने उभी राहिलेली दिसतात. २०२२ मध्ये गव्हाच्या उत्पादनात झालेली ९ ते ३४ टक्क्यांची घट, दुग्धोत्पादनातील १५ टक्क्यांपर्यंतची घट, टोमॅटो, फ्लॉवरपासून अगदी आंब्यासारख्या बागायती पिकांना बसलेला फटका, कोंबड्यांच्या मृत्यूदरात झालेली वाढ या सगळ्याला उष्णतेच्या लाटा कारणीभूत ठरल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ही अत्यंत चिंताजनक बाब ठरते. उष्णतेमुळे बाष्पीभवन वाढून जमिनीतील कोरडेपणा वाढतो. परिणामी अवर्षणाची शक्यता वाढते. तापमानवाढीचा धोका, एल निनोची चाहूल व बदलत्या हवामानाचा विचार करता भारतीय शेतीला आगामी काळात मोठ्या दुष्टचक्रातून जावे लागण्याची चिन्हे आहेत. एकतर शेती हा जोखमीचा व्यवसाय असल्याने आधीच अनेक जण त्यातून बाहेर पडले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, वातावरणीय स्थितीमुळे देशातील शेती कामगारांची कार्यक्षमता या शतकाच्या अखेरीस ४० टक्क्यांपेक्षा कमी होऊ शकते. याशिवाय उष्णता व आर्द्रतेच्या संयुक्त परिणामांमुळे कामगारांच्या सुरक्षेसोबतच मजुरांच्या टंचाईलाही सामोरे जावे लागेल, हा यातून देण्यात आलेला इशाराही गंभीर म्हणता येईल. म्हणूनच शेती-मातीची संस्कृती व कृषी अर्थव्यवस्था टिकविण्यासाठी परिस्थितीनुरूप बदलावे लागेल. त्याला अनुसरून एएफओने उष्णतापूरक बियाणे, सूक्ष्म सिंचन, पाणी बचत तंत्रज्ञान, हवामान अंदाजानुसार कार्यवाही, शेत मजुरांकरिता सुरक्षित कामाची व्यवस्था, पशुधनासाठी योग्य सावली व थंडावा, हवामान बदलांशी शेतीला जुळवून घेण्याकरिता स्थानिक नियोजन यांसारख्या महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. त्या अंमलात आणण्याच्या दृष्टीने आतापासून प्रयत्न झाले, तरच आपला टिकाव लागेल. सध्याचे जागतिक तापमान सुमारे १.४८ अंशांनी जास्त आहे. वाढीचा हा वेग अभूतपूर्वच. त्यामुळे पॅरिस हवामान परिषदेत ठरल्याप्रमाणे कार्बन उत्सर्जन कमी करण्याकरिता सर्व देशांना सामूहिक प्रयत्न करावे लागतील. अर्थात त्याकरिता सर्वप्रथम युद्धाच्या मानसिकतेतून बाहेर पडून पृथ्वीच्या हवामानाचा प्राधान्याने विचार करावा लागेल.

# जिद्दीच्या वारशातून लातूर जिल्ह्याचा विकास साधूया-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनी लातूर येथे राष्ट्रध्वज वंदन समारंभ उत्साहात

**लातूर :** भूकंपाच्या संकटाने हादरलेल्या लातूर जिल्ह्याने अत्यंत जिद्दीने स्वतः ला पुन्हा उभे केले आणि आपली क्षमता सिद्ध केली. तोच जिद्दीचा वारसा पुढे नेत, आपण राज्याच्या विकास प्रक्रियेत लातूरचे नाव अग्रभागी नेऊया आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधूया, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे केले.

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त बाभळगाव रोडवरील पोलीस मुख्यालय प्रांगणात मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन समारंभात पालकमंत्री श्री. भोसले बोलत होते. या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्र्यांनी यावेळी सर्व जिल्हावासीयांना महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.



संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करून आणि महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले, महाराष्ट्राने गेल्या ६६ वर्षांत तंत्रज्ञान, उद्योग आणि शेती क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वप्नात महाराष्ट्र आघाडीवर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्याचा विकास वेगाने होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेती विकास आणि जलसंधारणासाठी जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियान राबविले जात आहे. मनरेगा आणि भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून गतवर्षी ७३० हेक्टरवर फळबाग लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात मागील वर्षी पूर, अतिवृष्टीने शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ९२८ कोटी २८ लाख रुपयांची मदत वितरीत करण्यात आली आहे, असे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले.

प्रलंबित जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लागला असून या रुग्णालयाचे नुकतेच भूमिपूजन झाले आहे. लवकरच याठिकाणी ५०० खाटांचे सुसज्ज जिल्हा रुग्णालय उभे राहील. त्यामुळे आरोग्य सेवा अधिक बळकट होणार आहे. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी आणि आयुष्मान भारत- महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेतून गरजू रुग्णांवर कोट्यवधी रुपयांचे मोफत उपचार करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळविण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाईन व अधिक गतिमान झाल्याने रुग्णांना मदत होणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्ह्यात आतापर्यंत ७ हजार किलोमीटर रस्त्यांची कामे झाली आहेत. लातूर शहरासाठी ६० किलोमीटरचा रिंग रोड मंजूर असून, त्यासाठी ४८ किलोमीटर भूसंपादन पूर्ण झाले आहे. या मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळावा, यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. आशियाई विकास बँकेच्या मदतीने जिल्ह्यात ८६ किलोमीटर रस्त्यांची कामे सुरू आहेत. अर्थसंकल्पात १४७ कोटी रुपयांची नवीन कामे मंजूर झाली आहेत, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. येणारा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. भूकंपानंतर लातूरला पुन्हा उभे करणाऱ्या या मातीतील मुलांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा. लातूरचा विद्यार्थी नोकरी मागणारा नव्हे, तर नोकरी देणारा बनला पाहिजे, हेच आपले स्वप्न असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

पाण्याचा वापर जपून करण्याचे आवाहन

सध्या उन्हाळा अधिक तीव्र आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार बांधवांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. जिल्ह्यातील पाणी टंचाईसाठी २० कोटी ९६ लाख रुपयांचा आराखडा मंजूर केला आहे. सध्या २ टँकर सुरु असून २५ विहीरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यंदा एल-निनोमुळे कमी पाऊस अपेक्षित आहे, त्यामुळे खरीप हंगामासाठी विशेष तयारी केली जात आहे. पाणी टंचाईचे संभाव्य संकट लक्षात घेवून नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

पालकमंत्री श्री. भोसले यांनी यावेळी पोलीस परेडचे निरीक्षण केले. उपविभागीय अधिकारी अरविंद रायबोले यांनी पोलीस परेडचे नेतृत्व केले. पोलीस पथकांसह गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्र सेना, पोलीस बॅण्ड पथक, श्वान पथक, वज्र वाहन, बॉम्ब शोधक पथक, जलद प्रतिसाद पथक, रुग्णवाहिका यांच्यासह विविध शासकीय विभागांचे चित्ररथ या पथसंचलनात सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता आणि वीरपिता यांची पालकमंत्री श्री. भोसले यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार केला आणि महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच जिल्हा युवा पुरस्कार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार, टॅलेंट सर्च परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना यावेळी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

# मुंबईपुणे द्रुतगती मार्ग 'मिसिंग लिंक' : विकासाला वेग देणारा आधुनिक महामार्ग

## वेग, सुरक्षितता आणि आधुनिक अभियांत्रिकीचा संगम

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा कणा मानला जातो. राज्यातील औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक घडामोडींना गती देणारा हा मार्ग आता 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहे. केवळ वाहतूक सुलभ करण्यापुरता मर्यादित न राहता, हा प्रकल्प राज्याच्या व्यापक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा हा महामार्ग दररोज हजारो वाहनांची वाहतूक सांभाळतो. मात्र, बोरघाट परिसरातील तीव्र वळणे, चढ-उतार, पावसाळ्यातील दरडी कोसळण्याचे प्रकार आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी ही वर्षानुवर्षे मोठी समस्या राहिली. या अडचणींवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'मिसिंग लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आणि २९ ऑगस्ट २०१८ रोजी या महत्त्वाकांक्षी योजनेला शासनाची मंजुरी मिळाली. सुमारे ६६९५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला आहे.



पार्श्वभूमी : समस्येतून उपायाकडे

अडोशी बोगदा ते खंडाळा एक्झिट हा मार्ग सध्या सहा पदरी असला तरी येथे दहा पदरी वाहतूक एकत्र येते. घाटातील अवघड भौगोलिक परिस्थितीमुळे अनेकदा वाहतुकीचा वेग मंदावतो. विशेषतः पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका वाढतो आणि काही लेन बंद कराव्या लागतात. यामुळे वेळेचा अपव्यय, अपघातांची शक्यता आणि आर्थिक नुकसान वाढते. या पार्श्वभूमीवर 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा एक पर्यायी, अधिक सुरक्षित आणि सरळ मार्ग म्हणून उभारण्यात आला आहे.

प्रकल्पाचे स्वरूप : अंतर कमी, वेळ वाचणार

या प्रकल्पाअंतर्गत खोपोली ते कुसगाव दरम्यान नवीन सरळ मार्ग तयार करण्यात आला आहे. एकूण १९.८४ कि.मी. लांबीच्या या मार्गात ५.८६ कि.मी. अंतरावर जुन्या रस्त्याचे सहा पदरीवरून आठ पदरीकरण करण्यात आले आहे, तर उर्वरित १३.३ कि.मी. पूर्णपणे नवीन मार्ग आहे. या नव्या मार्गामुळे प्रवासाचे अंतर सुमारे ६ किमीने कमी होणार असून, २० ते ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.

अभियांत्रिकीचा अद्भुत नमुना

गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद

मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्सप्रेस-वे आता अधिक वेगवान आणि सुरक्षित होत आहे. मिसिंग लिंकसह वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. मिसिंग लिंक जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५ मीटर) असून लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा आहे. या ठिकाणी ६५० मीटर केबल-स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच सत्यावरील पूल पायलॉन उंची (१८२मीटर) असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वांत रुंद बोगदा म्हणून नोंद झालेली आहे.

हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवासाचा कालावधी लक्षणीयरित्या घटवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठी सुधारणा होणार आहे.

मिसिंग लिंक' प्रकल्प हा आधुनिक अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. या प्रकल्पात दोन समांतर बोगदे (१.६४ कि.मी. आणि ८.९२ कि.मी.), भव्य व्हायाडक्ट, यांचा समावेश असून, वाहनांचा वेग १२० कि.मी. / तास ठेवण्याची सुविधा या मार्गावर उपलब्ध आहे.सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान

या प्रकल्पात प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. बोगद्यांमध्ये वॉटर मिस्ट अग्निशमन प्रणाली, स्कॅडा आधारित नियंत्रण, एएनपीआर कॅमेरे, व्हाइस इव्हॅक्यूएशन सिस्टिम, आधुनिक वायुवीजन व्यवस्था आणि एसओएस सुविधा बसवण्यात आल्या आहेत. या सर्व प्रणालींमुळे अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देणे शक्य होणार आहे.

मिसिंग लिंकची व्यापक उपयुक्तता

'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे अनेक महत्त्वपूर्ण लाभ अपेक्षित आहेत. प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होणार असून, घाटातील धोकादायक वळणे टाळल्याने अपघातांचे प्रमाण घटेल. वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक सुरळीत होईल. इंधनाच्या वापरात घट होऊन दररोज सुमारे १ कोटी रुपयांची बचत होईल, अशी अपेक्षा आहे. एकूणच, हा प्रकल्प प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर बनवणार आहे.

कठीण परिस्थितीतही यश

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक आणि नैसर्गिक आव्हानांचा सामना करावा लागला. डोंगराळ भागात बोगदे खोदणे, घनदाट वनक्षेत्रात काम करणे, मुसळधार पावसामुळे होणारे अडथळे, तसेच बोगद्यांमध्ये ऑक्सिजन पुरवठा आणि सुरक्षा व्यवस्थापन ही मोठी आव्हाने होती. याशिवाय कोविड-१९ महामारीमुळे आणि काही तांत्रिक चाचण्यांसाठी परदेशी संस्थांवर अवलंबून राहावे लागले मात्र या सर्व अडचणींवर मात करत प्रकल्प यशयशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला.

विकासाच्या दिशेने मोठे पाऊल

मुंबईपुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ एक रस्ता नाही, तर आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि दृष्टीकोन यांचा संगम आहे. या प्रकल्पामुळे केवळ प्रवास सुलभ होणार नाही, तर राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. भविष्यात हा प्रकल्प महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या प्रगतीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. महामार्ग हे कोणत्याही राज्याच्या अर्थव्यवस्थेचे रक्तवाहिनीसारखे असतात. मुंबई आणि पुणे ही दोन प्रमुख आर्थिक केंद्रे जोडणारा हा मार्ग उद्योग, आयटी, उत्पादन क्षेत्र आणि सेवा क्षेत्रासाठी जीवनदायिनी भूमिका बजावतो. 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे या दोन शहरांमधील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि कार्यक्षम होणार असल्याने व्यापार आणि गुंतवणुकीला मोठी चालना मिळणार आहे.

दळणवळण सुविधांचा विस्तार

या प्रकल्पामुळे केवळ दोन शहरांमधील अंतर कमी होत नाही, तर संपूर्ण प्रदेशातील दळणवळण सुविधांचा दर्जा उंचावतो. खोपोली, लोणावळा, कुसगाव यांसारख्या परिसरांना अधिक चांगली जोडणी मिळणार आहे. त्यामुळे ग्रामीण आणि अर्धशहरी भागांपर्यंतही विकासाच्या संधी पोहोचतील. आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या सुविधा अधिक सहज उपलब्ध होतील.

पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्था

मुंबईपुणे मार्ग हा पर्यटनासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. लोणावळा, खंडाळा यांसारख्या पर्यटनस्थळांना या मार्गामुळे अधिक वेगाने पोहोचता येईल. परिणामी पर्यटन वाढून स्थानिक व्यवसाय, हॉटेल उद्योग आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल. स्थानिक रोजगारनिर्मितीतही वाढ होईल.

शाश्वत आणि संतुलित विकास

वाहतुकीचा प्रवाह सुरळीत झाल्यामुळे वाहनांची गर्दी कमी होईल आणि इंधनाचा वापरही घटेल. यामुळे पर्यावरणावर होणारा ताण कमी होण्यास मदत होईल. नियोजनबद्ध पायाभूत सुविधा विकासामुळे हा प्रकल्प शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरतो. मुंबईपुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ प्रवास सुलभ करणारा रस्ता नसून, राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा महामार्ग आहे. आर्थिक वाढ, दळणवळण सुधारणा, सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन या सर्व बाबींचा समतोल साधत हा प्रकल्प महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा अध्याय लिहिणार आहे.

-------------

**वंदना रघुनाथराव थोरात,**
**वरिष्ठ सहायक संचालक,**
**माहिती व जनसंपर्क**
**महासंचालनालय,मंत्रालय.**

## संक्षिप्त...

### राज्यात दिवसाला २४ अत्याचार, तासाला एक, रोहित पवारांनी मांडली हादरवणारी आकडेवारी; भोर तालुक्यातील घटनेवरून सरकारकडे मोठी मागणी

**पुणे/प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर गावात चार वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिला संपवण्यात आल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. यामुळे आज नसरापूर गावात कडकडीत बंद पुकारण्यात आला आहे. ग्रामस्थांनी घटनेबद्दल संताप व्यक्त करत नराधमाला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. या आज राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी पीडित कुटुंबियांची भेट घेतली. यानंतर माध्यमांशी संवाद साधताना रोहित पवार यांनी महाराष्ट्रात शक्ती कायदा लागू करण्याची मागणी केलीय.

रोहित पवार पत्रकार परिषदेत म्हणाले की, काल जो लोकांचा आक्रोश पाहायला मिळाला, तो योग्यच होता. अशी एखादी घटना घडत असेल तर लोक चिडणारच आहेत. काल एसपी साहेबांशी सुप्रिया ताईंनी चर्चा केली. मी आज एसपी साहेबांशी बोललो. हा क्रिमिनल दोन वेळेस अशाच प्रकारच्या घटनेत पकडला गेला होता पण बेलवर तो बाहेर आला. तिसरी घटना करण्याचे त्याचे धाडस झालेच कसे? उद्या जर हा परत बेल घेऊन बाहेर येणार असेल तर या कायद्याचे करायचे काय? अशी येथील लोकांची भावना आहे. पोलिसांनी समजावून सांगितल्यानंतर लोकांनी मान्य केले आहे.

१९८३ मध्ये सुप्रीम कोर्टचा एक निकाल आहे. ज्यात कॅपिटल पनिशमेंट म्हणजे क्रिमिनलचा मृत्यू झाला पाहिजे, अशी मागणी सरकारने केली होती. तसेच, या घटनेमध्ये जो गुन्हेगार आहे त्याला फाशीची शिक्षा पुढच्या काही दिवसात मिळू शकते. लोकांची आणखी एक भूमिका आहे की, मुलीच्या आईला आर्थिक मदत सरकारकडून मिळाली पाहिजे. त्या महिलेला शासकीय नोकरी देण्यात यावी, अशा मागण्या येथील लोकांनी केलेल्या आहेत, असे रोहित पवार म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी लोकांची फास्टट्रॅक कोर्टाची मागणी मान्य केली, असे मला समजले. एसपी साहेब म्हणाले पंधरा दिवसात चार्ज शीट दाखल केली जाईल आणि आरोपीला शिक्षा होईल. मंगळवारी येथील काही लोक मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहेत. या राज्यात एप्रिल २०२६ मध्ये १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बीडमध्ये अत्याचार झाला. जानेवारी २०२६ मध्ये बदलापूरची घटना घडली. एप्रिल २०२६ मध्ये बारामतीत एका दहा वर्षीय मुलीचे लैंगिक शोषण झाले. राज्यात दिवसाला २४ अत्याचार घडत आहेत. म्हणजे तासाला एक घटना घडत आहे. दरवर्षी ५० हजार महिलांच्या बाबतीत अत्याचार झालेले गुन्हे महाराष्ट्रात घडत आहेत. महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था राहिलेली नाही. गुन्हेगारांना कायद्याची भीती राहिलेली नाही का? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

महाविकास आघाडीच्या काळात लोकांच्या मागणीनुसार शक्ती कायदा आणला गेला होता. शक्ती कायदा आणल्यानंतर तो मान्य करून केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला होता. पण, केंद्र सरकारने तो परत एकदा महाराष्ट्राकडे पाठवला. त्यांना त्याचे नाव उचित वाटले नाही आणि त्याचा नंबर योग्य वाटत नाही, असे आम्हाला समजले. त्या कायद्यात कडक कारवाई करण्याबाबत आपल्या सरकारने सांगितले होते. त्यात २१ दिवसात निकाल लागला पाहिजे, तसेच ऑनलाईन कलमांबाबत काही कडक गोष्टी करण्यात आल्या होत्या. मात्र इतक्या कडक गोष्टी केल्यानंतर खरंच तुमचा तपास होईल का? अशी शंका केंद्र सरकारने व्यक्त केली. त्यामुळे तो कायदा पुन्हा एकदा महाराष्ट्रात आला. सर्वात पहिले शक्ती कायदा या महाराष्ट्रात लागू झाला पाहिजे. यासाठी पुढच्या काही दिवसात महाराष्ट्रात विशेष अधिवेशन घेतले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

### भारताचे जीएसटी महसूल संकलन एप्रिलमध्ये २.४३ लाख कोटी रुपयांवर

**मुंबई/प्रतिनिधी** : देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. एप्रिल महिन्यात वस्तू आणि सेवा कर महसूल संकलनात मोठी वाढ नोंदवली गेली असून, तो ८.७ टक्क्यांनी वाढून तब्बल २.४३ लाख कोटी रुपयांच्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचला आहे. हा आकडा एप्रिल २०२५ मधील २.२३ लाख कोटी रुपयांच्या आधीच्या विक्रमालाही मागे टाकणारा ठरला आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार, एप्रिल २०२६ मध्ये एकूण जीएसटी महसूल २,४२,७०२ कोटी रुपये इतका नोंदवण्यात आला. यामध्ये देशांतर्गत व्यवहार आणि आयात या दोन्ही घटकांचा महत्त्वाचा वाटा आहे.

महसूल वाढीमागील प्रमुख कारणे:

आयातीवरील जीएसटीमध्ये २५.८ज्ञब वाढ देशांतर्गत खपात सातत्याने वाढ आर्थिक व्यवहारांमध्ये वाढलेली पारदर्शकता

देशांतर्गत व्यवहारांमधून मिळणारा महसूल ४.३ टक्क्यांनी वाढून १.८५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला आहे. तर आयातीमधून मिळणारे जीएसटी संकलन २५.८ टक्क्यांनी वाढून ५७,५८० कोटी रुपये इतके झाले आहे, जे या वाढीतील सर्वात मोठा घटक ठरले.

रिफंड आणि निव्वळ महसूल:

एप्रिल महिन्यात ३१,७९३ कोटी रुपयांचे रिफंड देण्यात आले, जे मागील वर्षाच्या तुलनेत १९.३ टक्क्यांनी अधिक आहेत. रिफंड वजा केल्यानंतर निव्वळ जीएसटी महसूल ७.३ टक्क्यांनी वाढून सुमारे २.११ लाख कोटी रुपये झाला आहे.

अर्थतज्ज्ञांच्या मते, जीएसटी संकलनातील ही सातत्यपूर्ण वाढ देशातील आर्थिक क्रियाकलाप वाढत असल्याचे संकेत देते. वाढलेला खप, सुधारलेली कर वसुली व्यवस्था आणि डिजिटल व्यवहारांचा वाढता वापर यामुळे महसूलात वाढ होत असल्याचे मानले जाते.

व्यवसाय आणि उद्योगांवर परिणाम:

महसूल वाढ हा सरकारसाठी सकारात्मक संकेत असला, तरी काही उद्योगांसाठी कर अनुपालनाची कडक अंमलबजावणी ही आव्हानात्मक ठरू शकते. मात्र, दीर्घकालीन दृष्टीने ही पारदर्शकता आणि शिस्तबद्ध करप्रणाली अर्थव्यवस्थेला क मजबूत बनवेल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

एकूणच, जीएसटी महसूलातील हा विक्रमी आकडा देशाच्या आर्थिक आरोग्याचे सकारात्मक चित्र दर्शवतो आणि आगामी काळातही अशीच वाढ कायम राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीमध्ये नारीशक्तीचा सहभाग महत्त्वाचा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## – 'महालक्ष्मी सरस प्रदर्शना'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
## – 'उमेद'मार्ट ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर १ हजार नवीन वस्तू सूचीबद्ध

**मुंबई/प्रतिनिधी** : विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी नारीशक्तीचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. देशाच्या विकास वाटचालीत नारीशक्तीचे योगदान महत्त्वाचे असून ही नारीशक्ती ज्यावेळी संसाधन म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभागी होईल, तेव्हाच भारत पूर्णपणे विकसित होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा शब्दात नारी शक्तीचा सन्मान करीत देशात सर्वात पहिल्या एक कोटी लखपती दीदी महाराष्ट्रातच झाल्या पाहिजे, असे आवाहन यावेळी केले.



वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स संकुलातील एमएमआरडीए मैदानावर आयोजित महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायत मंत्री जयकुमार गोरे, कौशल्य विकास , उद्योजकता व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, ग्राम विकास व पंचायतराज राज्यमंत्री योगेश कदम, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, मुख्य परिचलन अधिकारी श्री. ओसवाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नारीशक्तीच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना सुरु केल्या आहेत. त्याचा लाभ महिलांना होत आहे. राज्यात ५० लक्ष लखपती दीदी तयार होत आहे. महिलांशी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणा 'पावर हाऊस' आहे. या महिला शक्तीच्या योगदानातून शासनाने सुरू केलेली ३०० कोटी वृक्ष लागवड मोहीम यशस्वी करायची आहे. उमेदच्या माध्यमातून यासाठी एक योजना तयार करण्यात यावी. या योजनेच्या माध्यमातून महिला बचत गटांना नर्सरी तयार करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्यात येईल. नर्सरी तयार करण्यापासून झाडे लावणे आणि त्याची निगा राखणे यासाठी पण खर्च शासन स्तरावरून देण्यात येईल. अशा महिला बचत गटांना वृक्ष लागवडीतून व्यावसायिक स्वरूपात मिळकत देखील होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाशी महालक्ष्मी सरस प्रदर्शनाची तुलना होऊ शकते, अशा प्रकारचे स्वरूप या प्रदर्शनाच्या आयोजनाला देण्यात आले असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात संबंधित विभाग आणि यंत्रणेच्या माध्यमातून महिला बचतगटांची मोठी चळवळ सुरू आहे. या चळवळीशी कोट्यावधी महिला जोडल्या गेल्या आहेत. बचतगटांच्या माध्यमातून अनेक महिलांनी आपली उत्पादने तयार केली असून त्यासाठी बाजारपेठही मिळवली आहे. कुटुंबासोबतच बचतगट सक्षम करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना अपेक्षित असलेले काम या महिलांनी केले आहे.

महालक्ष्मी सरस प्रदर्शन महिला बचत गटांच्या उत्पादनासाठी हक्काची बाजारपेठ आहे. सर्वसाधारण महिलांपासून ते अन्न तंत्रज्ञानात शिक्षण घेतलेल्या महिलांपर्यंत महिला बचत गटांच्या माध्यमातून उत्पादित उत्पादने महालक्ष्मी सरस प्रदर्शनामध्ये उपलब्ध असतात. व्यावसायिक स्वरूपामध्ये पॅकेजिंग केलेल्या वस्तू या प्रदर्शनामध्ये पाहायला मिळतात. यावरून कुठल्याही स्पर्धेसाठी महिला बचतगट आता सज्ज असल्याचे दिसत आहे.

देशात ई-कॉमर्स मोठ्या वेगाने वाढत आहे. उमेद मार्ट या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून महिला बचतगटांच्या उत्पादनांना ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर १००० पेक्षा जास्त वस्तू आहेत. राज्यातील नागरिकांनी उमेद मार्ट या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरूनच खरेदी करावी, असे आवाहनही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महिला बचत गटांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी २० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉलचे काम सुरू करण्यात आले आहे. उर्वरित १६ जिल्ह्यांमध्ये मॉलचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. काही वर्षात उमेद मॉलचे जाळे तालुका स्तरापर्यंत विस्तारित करायचे आहे, असेही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

प्रास्ताविकात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, महिलांच्या उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ महालक्ष्मी सरसमधून मिळाली आहे. महिला बचत गटांच्या उत्पादित वस्तूंचे देशातील हे सर्वात मोठे प्रदर्शन आहे. महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्याचे काम होत आहे. गाव खेड्यातील महिला सक्षमपणे पायावर उभ्या राहत आहे. राज्यात महिला बचत गटांच्या माध्यमातून 'उमेद' ३९ हजार ५५८ गाव खेड्यात पोहोचले आहे. महिला बचत गटांच्या चळवळीमुळे ६४ लाख कुटुंबाना लाभ मिळाला आहे. राज्यात सध्या ६ लक्ष ६८ हजार बचत गट आहेत. महिला बचत गटांसोबतच राज्यात ३३१ महिला शेतकरी कंपन्या आहेत.

विविध योजनांच्या आणि यंत्रणांच्या माध्यमातून महिलांना कर्ज वितरित करण्यात आले आहे. मात्र कर्ज परत फेडण्याची महिलांची वृत्ती त्यांचे वेगळेपण निदर्शनास आणते. त्यामुळे महिलांसाठी दिलेल्या कर्जाचा एनपीए १ टक्क्यांच्यावर नाही, असेही ग्रामविकास मंत्री गोरे म्हणाले. प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी आभार मानले.

सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी प्रदर्शनातील स्टॉलला भेट दिली. काही स्टॉल धारकांशी संवादही साधला. कार्यक्रमादरम्यान उमेदच्या माध्यमातून ६८ यशकथांवर आधारित निर्मित पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. तसेच उमेद मार्ट या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर १००० वस्तू सूचीबद्ध करण्यात आल्या. कार्यक्रमाला महाराष्ट्रातून आलेल्या असंख्य महिला उपस्थित होत्या.

## 'टीबी मुक्त भारत' अभियान झोपडपट्ट्यांपर्यंत नेण्याचा राज्यपालांचा संकल्प



**मुंबई/प्रतिनिधी** : टीबी मुक्त भारत अभियान' मुंबईतील प्रत्येक झोपडपट्टीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शुक्रवारी लोकभवन, मुंबई येथे व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त लोकभवन येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपालांनी 'टीबी मुक्त भारत लोकभवन महाराष्ट्र उपक्रम' या विषयावरील पोस्टरचे अनावरण केले.

उपक्रमाबाबत अधिक माहिती देताना राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या देशातून क्षयरोग निर्मूलनाच्या आवाहनाशी सुसंगत असल्याचे सांगितले.

मुंबईतील दाट लोकवस्तीच्या झोपडपट्ट्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

### ...तर निधी देताना विचार केला जाईल; मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटमांचा नगरसेवकांना सज्जड दम, महापालिकेतील अनुपस्थितीवरून सुनावलं!

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई भाजपच्या गोटातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पक्षशिस्त पाळणार नसाल तर निधी देताना विचार केला जाईल, असा सज्जड दम वजा इशारा देण्यात आला आहे. महापालिकेतील अनुपस्थितीवरून मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी भाजप नगरसेवकांना या संदर्भात थेट इशारा दिला आहे. महत्त्वाच्या प्रस्तावावेळी नगरसेवकांनी अनुपस्थित राहणे ही गंभीर बाब आहे. यापुढे सभागृहाच्या कामकाजात कुठलाही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असेही अमित साटम म्हणाले.

मुंबईकरांनी आपल्याला मोठ्या अपेक्षेने निवडून दिले आहे, त्या अपेक्षा पूर्ण करण्यात कमी पडू नका. असे सांगत अमित साटम यांच्याकडून नगरसेवकांची कानउघाडणी करण्यात आली आहे. ऑनलाइन बैठकीद्वारे मुंबई अध्यक्षांनी नगरसेवकांचा क्लास घेतालाय. दरम्यान याच मुद्दयांवर बोलताना महापौर रितू तावडे म्हणाल्या कि, नगरसेवकांनी उपस्थित राहणे गरजेचं आहे. पक्षाने नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. व्हीप बजावला असता का आले नाहीत? याबद्दल विचारणा केली आहे. विरोधकांना वाटत असेल की एक प्रस्ताव नामंजूर झाला म्हणजे सर्व झालं. पण आणखी पुढे

मुंबई नालेसफाईची पाहणी आजपासून सुरु केली आहे. अर्थसंकल्प सुरु होता, त्यानंतर महाराष्ट्र दिन त्यामुळं आजपासून नालेसफाई सुरु केली आहे. महायुतीची सत्ता आली आहे. त्यामुळे कोणी बसून काम करणार नाही, तर ग्राउंडवर उतरून काम करतील. माहुल नाल्यापासून सफाईची पाहणी सुरु केली. कारण सर्वात कमी काम या नाल्याच झालं आहे. जास्तीत जास्त काम कसं होईल, यावर भर दिला जात आहे. इथे आल्यावर एक गोष्ट जाणवली की कंत्राटदाराने कामाच्या ठिकाणी म्नूब लावलेले नाहीत, ते लावण्याचे आदेश दिले आहेत.

# पुरुष आयोग स्थापन करणे काळाची गरज!- समाजभूषण उत्तमराव तरकसे

**पुणे** : नुकताच स्वारगेट पुणे मधील श्री गणेश कला क्रीडा रंगमंचाच्या हॉलमध्ये पुरुष स्वाभिमानी फाउंडेशनच्या वतीने पत्नीपीडित पुरुषांना कायदेशीर मार्गदर्शन ,भावनिक आधार देण्याकरिता व सामाजिक जनजागृती होण्याकरिता राज्यस्तरीय पत्नीपीडित पुरुषाचे एकदिवसीय महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते

सदर मेळाव्यात उपस्थित पत्नीपीडितांना मार्गदर्शन व भावनिक आधार देण्याकरिता फाउंडेशनचे अध्यक्ष एडॅ संकेत दाभाडे, उपाध्यक्ष तुषार भोसले तसेच आयोजकाच्या आग्रहाच्या निमंत्रण स्वीकारून प्रमुख मार्गदर्शक म्हणून समाजभूषण मा श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर (महाराष्ट्र राज्य शासनाच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत) हे उपस्थित राहून उपस्थित्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की पुरुष आयोगाची स्थापना होणे काळाची गरज आहे.



कारण आत्ताचे शासन व कायदे हे एक प्रकारे कौटुंबिक वादाला खतपाणी घालत असल्याने सध्या पत्नीपीडित पुरुषाचे प्रश्न हे केवळ वैयक्तिक राहिले नसून ते पुढील पिढ्यांची पिढ्या बरबाद करत कौटुंबिक संस्था धोक्यात आणत राष्ट्राचे सुद्धा मोठे नुकसान करत असून देशासाठी व समाजासाठी हे एक गंभीर आव्हान ठरत आहे त्यामुळे पुढे देशाचे समाजाचे काय होईल सांगता येत नाही अशी चिंता व्यक्त करत पत्नीपीडित पुरुषाने आपल्या हक्कासाठी एकत्र येत संघर्षाचा नवा ध्यास घेतल्याशिवाय आपल्याला न्याय मिळणार नाही त्यासाठी लढा,लढत रहा मी तुमच्यासोबत आहे असे आव्हान करत इथून पुढे कोणत्याही पत्नीपीडित पुरुष आत्महत्या करणार नाही येवना कोणत्याही पुरुषाला आत्महत्या करू देणार नाही.

तसेच कोणत्याही व्यसनाच्या आहारी जाणार नाही कोणालाही जाऊ देणार नाही अशी उपस्थितांना प्रतिज्ञा करण्यास सांगत पुढे ते म्हणाले की आपण आपले हक्क संविधानिक मार्गाने घेऊ असा विश्वास व्यक्त करत त्यांनी शासनाकडे सदरच्या मेळाव्यातून १) पुरुष आयोगाची स्थापना लवकरात लवकर करावी २) खावटी थोडक्यात खंडणी असा उल्लेख करत त्यास चीन देशाच्या धरतीवर अमलात आणावा ३) महिला संरक्षण विषयक बनवलेल्या कायद्यात म्हणजे डी व्ही ४९८,२५ यासारख्या कायद्यात बदल करावा ४) स्त्री पुरुष समान कायदा करावा अशा शासनाकडे मागण्या करत ते पुढे म्हणाले की कायद्यात काळानुरूप बदल होणे गरजेचे आहे आपल्या भारत देशाचे संविधान सुद्धा संविधाननिर्माते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान हे लवचिक स्वरूपाचे ठेवले आहे कारण त्यात काळानुरूप बदल करण्यात यावा म्हणून मग कायद्यात बदल का नको त्यात सुद्धा बदल करणे आवश्यक आहे आणि ते शासनाने लवकरात लवकर करावा व न्यायालयाने त्याची अंमलबजावणी सुद्धा लवकरात लवकर करावी नसता ''बेटा बचावो देश बचाओ'' चा नारा देत मोहिमा राबवाव्या लागतील अशी इशारावजा सदर मेळाव्याच्या वतीने समाजभूषण उत्तमराव तरकसे यांनी शासनाकडे व न्यायपालिकेकडे मागणी करत उपस्थितत्यांना मार्गदर्शन केले

सदर मेळावा हा पूर्ण दिवसभराचा असल्याने सकाळी चहा नाश्त्याचे तसेच दुपारच्या जेवणाची सोय करण्यात आल्याने राज्यातील विविध जिल्ह्यातून तब्बल १००० ते १२०० पत्नीपीडित पुरुषाने आपल्या हक्कासाठी एकत्रितपणे आवाज बुलंद केला एडॅ संकेत दाभाडे व तुषार भोसले यांनी उपस्थितात्यांना कायदेशीर मार्गदर्शन करत पत्नीपीडित पुरुषाला भेडसवणाऱ्या गुंतागुंतीच्या समस्यातून न्याय मिळवण्यासाठी आवश्यक कायदेशीर तरतुदी आणि त्यांचा योग्य वापर कसा करावा याबाबत योग्य कायदेशीर मार्गदर्शन करत उपस्थिताचे आभार मानत समाजभूषण उत्तम तरकसे साहेबांचा आव्हानाला साथ देत हा लढा आम्ही आणखी व्यापक उभारू असे आश्वासन देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

E-mail : dainikmahavratt@gmail.com

दैनिक महावृत्त

लातूर

रविवार दि. ०३ मे २०२६



## विविध वृत्त...

### महावितरण मार्फत वीज वाहिनी दुरुस्तीसाठी रविवारी पाणीपुरवठा बंद राहणार, मनपाची माहिती

**लातूर/प्रतिनिधी** : वीज वाहिनीची दुरुस्ती करण्यासाठी रविवार दि.३ मे रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद राहणार असल्याची माहिती महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.

धनेगाव येथून लातूर शहराला पाणीपुरवठा केला जातो. धनेगाव येथून पाणी आलेनंतर हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रावर पाणी शुद्धीकरण करुन शहरास पाणीपुरवठा करण्यात येतो. हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्र हरंगुळ येथील ३३ केव्ही एक्सप्रेस लाईन वरील दुरुस्ती काम करणेसाठी महावितरण मार्फत विद्युत पुरवठा बंद राहणार असल्यामूळे हरंगुळ येथील डब्लू. टी.पी.येथील पंपीग बंद राहणार आहे.त्यामूळे रविवार दि.३ मे रोजी शहरात पाणीपुरवठा बंद राहणार असून नागरिकांनी सहकार्य करावे,असे आवाहन पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात केले आहे.

### दुसऱ्या बौद्ध साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून रोहित पिसाळ तर संमेलनाध्यक्षपदी प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड यांची निवड





**लातूर/प्रतिनिधी** : लातूर येथे दिनांक १० मे २०२६ रोजी भालचंद्र ब्लड बँक, लातूर याठिकाणी वेळ ठिक १० वाजता होणाऱ्या दुसऱ्या बौद्ध साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून रोहित पिसाळ यांची तर अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ.प्रशांत गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. मा.रोहित पिसाळे हे प्रसिध्द उद्योगपती तथा धम्म अभ्यासक आहेत तर प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड हे पेठ वडगाव, जि. कोल्हापूर येथील श्री विजयसिंह यादव महाविद्यालयात गेली २५ वर्षे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

फुले- आंबेडकरी विचारधारा, बौद्ध संस्कृतीतील मूल्ये, साहित्य, समीक्षा आणि तत्त्वज्ञान हे त्यांचे विशेष अभ्यास विषय आहेत. मराठी साहित्यातील बुद्धचरित्र आणि तत्त्वज्ञान: एक अभ्यास, या विषयावर त्यांनी शिवाजी विद्यापीठातून पीएचडी प्राप्त केली आहे. बौद्ध साहित्यावर आधारित धम्मपहाट (कवितासंग्रह ),तथागत बुद्ध चरित्र आणि तत्त्वज्ञान( समीक्षा), मराठी कथेतील नवे वळण : परिव्रजक (समीक्षा) हे ग्रंथ प्रकाशित आहेत. डॉ. आ.ह.साळुंखे यांच्या जीवनावर आधारित त्यांचे चरित्र लिहिण्याचे कामही डॉ. गायकवाड यांनी केले आहे. सत्य असत्याशी मन केले ग्वाही (आ.ह. साळुंखे : जीवन आणि भूमिका) (चरित्र), आ.ह. साळुंखे : विचारप्रवर्तक मुलाखती (संपादन) आ.ह. साळुंखे आणि चार्वाकदर्शन (समीक्षा) आ.ह.साळुंखे स्त्रीविषयक चिंतन (सहसंपादन) इत्यादी ग्रंथ प्रकाशित आहेत. डॉ. गायकवाड यांनी लिहिलेल्या काही नोंदी ऑनलाईन मराठी विश्वकोशात यापूर्वी प्रकाशित झाल्या आहेत. तर त्यांच्या काही ग्रंथांचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणूनही समावेश करण्यात आला आहे . यापूर्वी त्यांच्या साहित्यकृतींना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

या संमेलनाच्या चर्चा सत्रामध्ये डॉ. नारायण कांबळे, डॉ.विजय गैबीमोरे, डॉ.गिरीश मोरे, अमित मेधावी यांच्यासह अनेक साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. समारोपासाठी ज्येष्ठ आंबेडकरी नेते प्रा. सुकुमार कांबळे यांची उपस्थिती आहे. तरी या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष-चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष-राजेंद्र कांबळे, उपाध्यक्ष-भगवान लोखंडे, डी.एस.नरसिंगे, सचिव-यु.डी. गायकवाड, कोषाध्यक्ष - एम.एम.बलांडे, राजेंद्र बनसोडे, मुख्य निमंत्रक - ॲड.धम्मदिप बलांडे, रविंद्र राजेगावकर, शांतरक्षीत सुरवसे, डॉ.लहु वाघमारे, देवदत्त बनसोडे, अशोक बनसोडे, मारूती सरवदे, अलका गायकवाड, मंगलताई कांबळे, पल्लवी घोबाळे आदींनी केले आहे.

### आधी पुतणीवर अतिप्रसंग, मग महिलेवर अत्याचार अनब आता ४ वर्षाच्या चिमुकलीचा बळी; भोरमधील नराधमाचा काळा इतिहास उघड!

**पुणे/प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे मानवतेला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. वासरू दाखवण्याच्या बहाण्याने एका ६५ वर्षीय वृद्धाने साडेतीन वर्षांच्या निष्पाप चिमुकलीला जनावरांच्या गोठ्यात नेऊन तिच्यावर पाशवी अत्याचार केले. आपले बिंग फुटू नये म्हणून या नराधमाने चिमुकलीची निर्घृण हत्या केली आणि तिचा मृतदेह गोठ्यातच दडवून ठेवण्याचा प्रयत्न केला. मुलगी बेपत्ता असल्याने शोधाशोध करणाऱ्या कुटुंबीयांना तिचा मृतदेह त्याच गोठ्यात आढळून आल्याने मोठा धक्का बसला. या भयंकर घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली असून, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तपासाबाबतची माहिती दिली आहे. नसरापूर येथील भीषण घटनेवर बोलताना पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी स्पष्ट केले की, काल संध्याकाळी ४ वाजेच्या सुमारास हा संतापजनक प्रकार घडला. सव्वा पाच वाजता पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या दीड तासात आरोपीच्या मुसक्या आवळल्या. मात्र, दुर्दैवाने तोपर्यंत या नराधमाने चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केली होती.

# विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या शिक्षकांचे संस्कार, ज्ञान कायम जिवंत राहते - ऋषिकेश कराड

## श्रीराम विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा





**लातूर/प्रतिनिधी** : शिक्षक म्हणजे गुरु आणि गुरु म्हणजे विचार हा विचार कधीच सेवानिवृत्त होत नसतो तो विचार सातत्याने ज्वलंत राहणारा आहे. शिक्षक हे केवळ शिकवत नाही तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्याचे काम करतात त्यांचे संस्कार आणि ज्ञान कायम जिवंत राहतात खऱ्या अर्थाने शिक्षक हे कधीच निवृत्त होत नाहीत तर ते कायम मार्गदर्शकाच्या भूमिकेतून कार्यरत राहणारे व्यक्तिमत्व आहे असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर येथील रेणुका शिक्षण संस्थेच्या श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे यांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा शुक्रवार १ मे २०२६ रोजी मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार श्री विक्रम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला याप्रसंगी ऋषिकेशदादा कराड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी माजी आमदार बब्रुवान खंदाडे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, पसं उपसभापती शरद दरेकर, रेणापुरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, जेष्ठ मार्गदर्शक ओमप्रकाश गोडभरले, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदास कुटवाड, सचिव पंडितराव उगले, उपाध्यक्ष रविकांत आकनगिरे, नगरपंचायतीचे राजू आत्तार, दत्ता सरवदे, पदमसिंह पाटील, सचिन मोटेगावकर, चेअरमन देविदास कातळे, संस्थेचे विठ्ठल कटके, सुधीर बरुरे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

शाळेत जाईपर्यंत आई- वडिल घडवतात आणि आयुष्याला दिशा देण्याचे काम शिक्षक करीत असतात. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया असून शिक्षकांच्या गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच अनेकांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडले असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, सिद्धेश्वर मामडगे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या त्याचबरोबर संस्थेच्या प्रगतीत मोलाची कामगिरी केली असून आज जरी ते सेवानिवृत्त होत असले तरी उर्वरित आयुष्यातील वाटचालीचा समाजासाठी, कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी नवा अध्याय सुरू करत आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा प्रकाश सतत पसरत राहील त्यांच्या हातून या पुढील काळातही समाजाची सेवा घडो अशा सदिच्छा दिल्या.

गावचे सरपंच, चेअरमन, पतसंस्थेचे चेअरमन जिथे जाईल तिथे मिळालेल्या संधीच सोनं करण्याचा प्रयत्न विविध पुरस्कार प्राप्त सिद्धेश्वर मामडगे सरांनी केला असल्याचे उद्‌गार काढून आ. विक्रम काळे म्हणाले की, हजारो विद्यार्थी घडविण्याचे काम त्यांच्या हातून झाले असून शिकून किती गेले यापेक्षा शिकलेले काय करतात हे महत्त्वाचे आहे. मामडगे सरांनी अत्यंत निष्ठेने कर्तव्य निभावले आहे. प्रत्येक कामात स्वतःला झोकून देऊन कार्य केले असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. प्रारंभी अनिल कुटवाड यांनी आपल्या प्रास्ताविकातून सिद्धेश्वर मामडगे यांच्या कार्याचा आढावा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्वर स्वामी आणि लोकां शेवाळे यांनी केले. या कार्यक्रमास शैक्षणिक सामाजिक व इतर विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी ‘मॅपिंग’ मोहीम

### - लातूर तालुक्यातील मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन- २५ एप्रिलपासून बीएलओ देत आहेत घरोघरी भेट- सन २००२ च्या मतदार यादीशी होणार पडताळणी

**लातूर/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार यादी अधिक पारदर्शक आणि निर्दोष करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग (पडताळणी) करणे अनिवार्य असून, लातूर तालुक्यातील सर्व मतदान केंद्रांवर २५ एप्रिल २०२६ पासून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपलब्ध आहेत.

मॅपिंग प्रक्रियेचे स्वरूप

दुबार आणि तिबार मतदारांचा शोध घेण्यासाठी पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूच्या धर्तीवर आता महाराष्ट्रातही मतदारांची पडताळणी केली जात आहे. मतदारांनी त्यांच्याकडील मतदार ओळखपत्र दाखविल्यानंतर बीएलओ २००२ मधील मतदारसंघ, भाग क्रमांक आणि अनुक्रमांक या आधारावर मॅपिंग करणार आहेत. ज्या मतदारांची नोंद २००२ नंतरची आहे, अशा मतदारांची पडताळणी त्यांच्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या नावाच्या आधारावर केली जाईल.

बीएलओंची उपलब्धता

एप्रिल पासून दररोज सायंकाळी ४ ते ७ या वेळेत बीएलओ मतदान केंद्रावर उपस्थित राहतील. तसेच इतर वेळी बीएलओ मतदारांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार आहेत. जे मतदार या मॅपिंग प्रक्रियेत सहभाग घेणार नाहीत, त्यांना आगामी सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेवेळी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर प्रत्यक्ष सुनावणीला सामोरे जावे लागेल. या सुनावणीत पुराव्यांची तपासणी झाल्यानंतरच मतदार यादीत नाव कायम ठेवले जाईल. ही सुनावणीची प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी बीएलओंना सहकार्य करून आपले मॅपिंग पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नेऱ्हे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## ‘नीट’ परीक्षा पूर्वतयारीचा प्रभारी जिल्हाधिकारी राहुल कुमार मीना यांनी घेतला आढावा



**लातूर** : लातूर जिल्ह्यातील ३४ परीक्षा केंद्रांवर रविवार, ३ मे २०२६ रोजी नीट युजी २०२६ परीक्षा पार पडणार असून, या अनुषंगाने जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी आढावा घेतला. लातूर जिल्ह्यातील ३४ परीक्षा केंद्रांवर सुमारे १६ हजार ३०० विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत. उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेवून परीक्षा केंद्रावर विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

प्रत्येक परीक्षा केंद्रावर कर्तव्य दंडाधिकारी, डॉक्टर व आरोग्य पथके तैनात करण्यात आली आहेत. या पथकांकडे उष्माघातावरील उपचारासाठी आवश्यक औषधे मुबलक प्रमाणात उपलब्ध असतील, तसेच वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णवाहिकांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थ्यांसाठी सावलीची व्यवस्था आणि दिशादर्शक फलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, शहरात विद्यार्थी आणि पालकांची होणारी गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाला चोख बंदोबस्ताचे आदेश दिले आहेत. या परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होवू नये, यासाठी सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, अशा सूचना प्रभारी जिल्हाधिकारी राहुल कुमार मीना यांनी दिल्या.

यावेळी उपजिल्हाधिकारी संगीता टकले, गणेश पवार, सायली ठाकूर, नीट परीक्षा जिल्हा संपर्क अधिकारी डॉ. महेंद्र गायकवाड आणि महेश सूर्यवंशी यांच्यासह संबंधित अधिकारी, नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षाची स्थापना

नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे नीट युजी-२०२६ ही अखिल भारतीय प्रवेश परीक्षा ३ मे २०२६ रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यात या परीक्षेचे कामकाज सुरळीत पार पडावे आणि विद्यार्थ्यांना परीक्षेच्या संदर्भात काही समस्या उद्भवल्यास त्यांचे तत्काळ निराकरण व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

या नियंत्रण कक्षाचे प्रमुख म्हणून नायब तहसीलदार पंकज मंदाडे (भ्रमणध्वनी क्र : ९६०४६०१७९५) यांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर नियंत्रण कक्ष सहाय्यक म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमले (भ्रमणध्वनी क्र : ९४०५२८१०९८) काम पाहतील. याव्यतिरिक्त आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, लातूर महानगरपालिका, महावितरण, एसटी महामंडळ आणि शिक्षण अशा विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

परीक्षार्थी किंवा पालकांना काही तातडीची अडचण असल्यास त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षाच्या ९३५६४०४९२० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# इयत्ता १२ वी मधील यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षणमंत्र्यांकडून अभिनंदन

## आवडीनुसार आणि कल विचारात घेऊन पुढील वाटचाल करावी – शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे



**मुंबई/प्रतिनिधी** : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) परीक्षेत यश मिळविलेले विद्यार्थी, त्यांचे पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन करीत विद्यार्थ्यांनी आपली आवड आणि कल विचारात घेऊन पुढील वाटचाल करावी, या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी हताश न होता पुन्हा नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे व यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी- मार्च २०२६ मध्ये आयोजित उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेचा निकाल शनिवार दि. २ मे २०२६ रोजी मंडळाच्यावतीने जाहीर करण्यात आला.

याबाबत शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले, बारावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्वाचा टप्पा आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीला आज फळ मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांच्या पालकांचा त्याग आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे. या परीक्षेतील यशानंतर विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार विविध क्षेत्रांमध्ये वाटचाल करण्याचा मार्ग खुला झाला आहे. पुढील उच्च शिक्षणासाठी ज्या ज्या क्षेत्रात विद्यार्थी जातील त्या क्षेत्रात महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे. तुम्ही उद्याच्या भारताचे आधारस्तंभ आहात, तुमच्या कर्तृत्वातून एक समृद्ध समाज घडवण्याचे स्वप्न आपण सर्व मिळून पूर्ण करूया, अशा शब्दांत मंत्री दादाजी भुसे यांनी विद्यार्थ्यांचा गौरव केला आहे.

ही परीक्षा अंतिम ध्येय नसून, यामुळे ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, त्यांनी खचून न जाता नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे आणि यश संपादन करावे. हा निकाल विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य ठरवू शकत नाही. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी जून- जुलै महिन्यात पुन्हा परीक्षा होतील. शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी या विद्यार्थ्यांना दिलासाही दिला.

निकालाची वैशिष्ट्ये :

या परीक्षेत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य, व व्यवसाय अभ्यासक्रम व आयटीआय या शाखांसाठी एकूण १४,४४,७१३ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,३३,०५८ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी १२,८६,८४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची ही टक्केवारी ८९.७९ आहे. सर्व विभागीय मंडळांमधून कोकण विभागाचा निकाल ९४.१४ टक्के इतका सर्वाधिक आहे.

विभागीय मंडळ निहाय निकाल

कोकण विभागातील ९४.१४ टक्के, पुणे ९१.२५ टक्के, अमरावती ९०.९२ टक्के, नाशिक ९०.७२ टक्के, मुंबई ९०.०८ टक्के, कोल्हापूर ८९.९७ टक्के, छत्रपती संभाजीनगर ८८.६८ टक्के, नागपूर ८८.६७ टक्के आणि लातूर विभागातील ८४.१४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

मुलींची टक्केवारी अधिक

सर्व विभागीय मंडळांतून नियमित मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८६.८० टक्के असून मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९३.१५ टक्के आहे. म्हणजेच मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ६.३५ टक्क्यांनी जास्त आहे.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १,४२,६९७ विद्यार्थी प्रावीण्यासह, ३,६२,०३३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ५,८१,५१९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २,००,५९४ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

श्रेणीसुधार/ गुणसुधार योजना

या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी / गुणसुधार योजनेअंतर्गत फक्त लगतच्या तीन परीक्षांमध्ये पुन:श्च परीक्षेस प्रविष्ट होता येईल. त्यानुसार फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊन सर्व विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना (एकाच वेळी सर्व विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या) जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७ व जून-जुलै २०२७ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस श्रेणीसुधार/ गुणसुधारसाठी प्रविष्ट होण्यास तीन संधी देण्यात येत आहेत, असे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.